# प्रशासकीय मान्यता पत्रे

राज्य शासनाच्या निर्देशानुसार संचालक कार्यालय तसेच विद्यापीठ यांनी वेळोवेळी परिपत्रके जारी करून या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसंबंधी सूचना दिलेल्या आहेत. याशिवाय, महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेत या उपक्रमाचा समावेश करण्यासही मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यामुळे या उपक्रमांतर्गत आकारण्यात येणारे शुल्क विविध शासकीय प्रतिपूर्ती शिष्यवृत्ती योजनांद्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यास सुलभता निर्माण होऊ शकते.

DHEPN-MVI1011(CLR)/19/2025-COLLWG1 I/1294350/2025

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,**
**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**
**Web :** www.dhepune.gov.in **E-Mail : mavi.dhepune@gov.in**
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र.: उशिसं/मवि-१/परिपत्रक- करिअर कट्टा/२०२५/ ई. ऑफीस- १८०४२२६ दि. /०६/२०२५

**परिपत्रक**

**विषय : करिअर कट्टा या उपक्रमाचे शुल्क विद्यापीठ शुल्क रचने अंतर्गत विविध गुणदर्शन व उपक्रम शुल्क (Extra-curricular वा activity fees) या शीर्षकांतर्गत अंतर्भूत करणेबाबत.**

वाचा - १. संचालनालयाचे पत्र क्रमांकः विद्यार्थी २११९/प्र.क्र.२७/मवि-१/२१०५ दि. १८.२.२०२१
२. शासनपत्र क्र.: संकीर्ण २३२३/प्र.क्र.११५/मशि-२ दि. ६ जून २०२३
३. अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र- कोल्हापूर यांचे पत्र क्र.: MITSC/OUT/FEBRUARY 2023/M/1313 FN. ९.२.२०२३

"करिअर कट्टा" या उपक्रमाच्या अंमलबजावणीबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर उपक्रमाची अंमलबजावणी करत असताना, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत महाविद्यालयाच्या शुल्क निर्धारणाची विविध अधिकार मंडळांची विहीत प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर करिअर कट्टा या उपक्रमाचे शुल्क (रु. ३६५/-) हे वेगवेगळया शीषकांतर्गत समाविष्ट केले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता राखण्यासाठी "करिअर कट्टा" या उपक्रमासाठीचे नोंदणी शुल्क (रु. ३६५/-) हे विद्यापीठ शुल्क रचने अंतर्गत **'विविध गुणदर्शन व उपक्रम शुल्क'** (Extra-curricular वा activity fees) या शीर्षकांतर्गत समाविष्ट करण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे सूचना आपल्या स्तरावरुन सर्व संलग्नित महाविद्यालयांना देण्यात याव्यात.

महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित विद्यापीठांनी संकलित करुन एकत्रित स्वरुपात विभागीय सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण यांना सादर करावा. विभागीय सहसंचालक कार्यालयांनी सदर अहवाल संचालनालयास सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 19-06-2025 18:27:45

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव - मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४७
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dtc.maharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२३/ १७२

दिनांक : 12 JUN 2023.

12 JUN 2023

प्रति.
सहसंचालक.
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : **तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधित तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये " करिअर कट्टा " विषयक माहिती देणे व नोंदणी अभियान राबविण्याबाबत....**

संदर्भ : १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २३२३/ प्र.क्र.११५/ मशि-२, दिनांक ६.६.२०२३

२) अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक MITSC/OUT/FEBRUARY २०२३/M/१३१३, दिनांक ९.२.२०२३

शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,कोल्हापूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार **" करिअर कट्टा "** उपक्रमाची माहिती उच्च शिक्षणाशी संबंधित संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये देणे व या संस्थांमध्ये विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत निर्देश संदर्भाधीन शासन पत्रानुसार दिलेले आहेत. दिनांक ८.६.२०२३ रोजी मा.मंत्रीमहोदयांनी घेतलेल्या आढावा बैठकीत सदर निर्देशाप्रमाणे तंत्रशिक्षणाशी संबंधित संस्थांच्या माहितीपुस्तिकांमध्येही करिअर कट्टा उपक्रमाची माहिती आणि विद्यार्थ्यांचे नोंदणी अभियान राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून प्रसिध्द करण्यात येणा-या माहिती पुस्तिकेमध्ये " करिअर कट्टा " विषयक उपक्रमाची माहिती समाविष्ट करण्याबाबत आणि विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांना कळविण्यात यावे. अधिक माहितीसाठी संदर्भाधीन पत्रांची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकरणी आपल्या अधिनस्त संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रत्येक विभागाने संकलित करुन विभागनिहाय एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करावा. संस्थांना थेट संचालनालयास अथवा शासनास अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात येऊ नये या बाबीची विशेषत्वाने नोंद घ्यावी.

(डॉ.विनोद मोहितकर)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत माहितीसाठी :-
१.मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई
२. अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र कोल्हापूर (ई मेल द्वारे uvajagar@gmail.com)